# बबूश्का आणि तीन राजे

## रूसी बालकथेवर आधारित

रुथ, चित्र : निकोलस, मराठी : अश्विनी बर्वे





# बबूश्का आणि तीन राजे

## रूसी बालकथेवर आधारित

रुथ, चित्र : निकोलस, मराठी : अश्विनी बर्वे

ही खूप जुनी गोष्ट आहे, आणि खूप दूरवरच्या देशाची आहे. कडक थंडी पडली होती आणि गार गार वारं एका छोट्या घराच्या चारी बाजूने वेगाने वहात होते.



घरात बबूश्का फरशी झाडत-पुसत होती. चुलीत लाकडं घालत होती. त्या म्हातारीला आपल्या छोट्या घरात असणाऱ्या कमी सुख सोयींचा सुद्धा अभिमान होता. बाहेर बर्फ पडत होता आणि सू-सू करत गार हवा वाहत होती. पण बबुश्का आपल्या छोट्या घरात चुलीसमोर बसून शेकत होती. हळूहळू दिवस संपला आणि रात्र झाली. मग बबुश्काला जोरात वाहणाऱ्या हवेच्या बरोबरच बिगूल पण ऐकू येवू लागला.




याचा अर्थ काही लोक तिच्या घराकडे येत होते. त्या घोळक्यात सर्वात पुढे एक बर्फाची गाडी होती आणि तिला तीन पांढरे घोडे ओढत होते.



त्या बर्फ गाडीत तीन छान माणसं बसली होती.

त्यांनी गडद लाल रंगाचे रेशमी अंगरखे घातले होते. त्यांच्या डोक्यावर रत्नजडित मुकुट होते. बर्फाच्या गाडी मागे घोडेस्वार होते, आणि त्यामागे पायदळ होते.



तो घोळका बबुश्काच्या छोट्या घरासमोर येऊन थांबला. कोणीतरी बबुश्काच्या झोपडीचे दार वाजवले. जेव्हा तिने दार उघडले, तेव्हा तिच्या समोर तीन अनोळखी माणसे उभी होती. त्या गरीब स्त्रीने त्यांचे महागडे, राजेशाही कपडे, बर्फासारखी पांढरी दाढी आणि दयाळू डोळ्यांकडे तिने उत्सुकतेने बघते. “कोण आहेत हे लोक?” बबुश्काने विचार केला.

बबूश्काचा विचारात पडलेला चेहरा बघून एका माणसाने हसत हसत तिला सांगितले, “आम्ही लोक त्या चमकत्या ताऱ्याचा पाठलाग करतो आहे. जिथे एका लहान बाळाचा जन्म झाला आहे. पण आम्ही लोक बर्फात भरकटले गेलो आहोत.”




“तू आमच्या बरोबर चल बबुश्का. त्या मुलाला शोधण्यासाठी, त्याला भेटवस्तू देण्यासाठी आणि त्याच्या जन्माचा आनंद साजरा करण्यासाठी तू आम्हांला मदत कर.”

बबूश्का बर्फात थंडीने कुडकुडत होती. तिने खांद्यावर पातळशी शाल घेतली. “महोदय! आपण घरात यावं आणि थोड्यावेळ आगी जवळ बसावं. माझं अजून दिवसभराचं काम संपलं नाही. या भयानक आणि निर्दयी रात्री बाहेर जायचे नाव काढले तरी मी कापत आहे. सकाळची वेळ रात्रीपेक्षा चांगली असेल. आजची रात्र तुम्ही माझ्या या छोट्या घरात आराम करा. सकाळी मी आपल्या बरोबर नक्की येईन.”



“आमच्या जवळ वेळ फार कमी आहे, बबूश्का,” अजनबी मऱ्हाळे. “जर तू लगेच बरोबर आली नाही तर आम्ही आमचा प्रवास सुरूच ठेवू.” त्यानंतर ते अनोळखी लोक त्या बर्फाच्या वादळात गायब झाले.





बबूश्का परत घराच्या साफसफाई मध्ये मग्न झाली. कामं संपल्यावर ती चुलीसमोर बसून एकटीच रात्रीचे जेवण जेवू लागली. जळणाऱ्या लाकडाची ऊब तिच्या हृदयाला स्पर्श करत होती. बाळाच्या जन्माची बातमी ऐकून तिच्या मनात आनंद आणि दयेची लहर उमटली. "किती सजून धजून आले होते ते तिघं! दिसायला एकदम राज्यासारखे होते. बबुश्का जोरात म्हणाली, "ते काही एखाद्या सामान्य मुलाला बघायला जात नसणार. मलाही त्यांच्या मागे मागे जायला हवं. मी पण नवजात बालकाचे दर्शन घेईन आणि त्याला काही भेट देईन. आता हेच बबुश्काला करावं वाटू लागलं.त्याशिवाय तिला काही सुचेनासे झालं. तिच्या मनातले हे विचार म्हणजे जशी अंधारात एखादी मेणबत्ती जळते तसे होते.




मग बबुश्का सकाळ होण्याच्या आत उठली आणि तिने प्रवासाची तयारी सुरु केली. तिने एका पिशवीत छोट्या-मोठ्या स्वस्त भेटवस्तू ठेवल्या. जसा नवीन दिवस सुरु झाला, आणि बबुश्काने आपला प्रवास सुरु केला. म्हाताऱ्या बाईने काल रात्री त्या घोळक्याने केलेल्या पाउलखुणा शोधण्याचा प्रयत्न केला. पण रात्री बर्फ पडल्यामुळे सगळ्या पाउलखुणा झाकल्या गेल्या होत्या.




मग ती जागोजागी थांबून प्रत्येक अनोळखी माणसाला विचारू लागली, “ते तीन राजे कोणत्या दिशेला गेले? तेच लोक जे नवजात बाळाला बघायला निघाले होते.” तिने म्हताऱ्या माणसांना विचारले, युवक वाटसरूंना विचारले. पण कोणीच बबुश्काला मदत करू शकले नाही. त्यानंतर बबुश्का बर्फावर उभ्या उभ्या मुलांना खेळतांना पाहत राहिली. तिच्या जवळ भटके कुत्रे भुंकत होते आणि नाचत होते. पण बबुश्काला उशिर करायचा नव्हता. म्हणून ती पुढे निघाली.



बबूश्का गावागावात,घरा-घरात विचारत पुढे जात होती, “तुम्ही कोणी त्या नवजात बाळाला पाहिलं आहे का?” आणि प्रत्येक वेळी तिला उत्तर मिळाले, - कोणीही त्याला बघितले नाही. न थांबता, आळस न करता बबुश्का त्या लहान बाळाच्या शोधात पुढे जाऊ लागली.



लोक म्हणत की, दरवर्षी नवीन बाळ जन्माला आल्याची बातमी येत असते. तेव्हा बबुश्का नव्या उमेदीने सगळ्या देशात त्याला शोधते.



लोक असेही म्हणत की दरवर्षी लहान मुले बबुश्काच्या येण्याची अधीर होवून वाट पहात. बबुश्का रात्रीच्या अंधारात मुलांसाठी आपल्या भेटवस्तू ठेवून जाते.मुलांना बबुश्काच्या स्वस्त, कमी किमतीच्या भेटवस्तू घेतांना अपार आनंद वाटत असे.





"सरळ पण अत्यंत सुंदर..." - न्यू-यॉर्क टाइम्स

## पुस्तक परीक्षण

"ही एक रूसी लोककथा आहे. ही कहाणी एक म्हातारी,जी तीन राजांच्या बरोबर जाण्यास नकार देते, त्याविषयी आहे. ती स्वतः नवजात बालकांचा शोध घ्यायला निघते.तिला ते नवजात बाळ मिळत नाही. म्हणून ती आपले प्रयत्न चालूच ठेवते. पुस्तकातली चित्रे आणि डिझाईन उत्कृष्ट आहेत."

–बुक-लिस्ट